**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः संजय शंकर मालुसरे,

वयः ५४ वर्षे, व्यवसायः नोकरी, दु. निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

राहणारः रोहा, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दि.२७.०२.२०२३ रोजी मी निरिक्षक कार्यालय, रोहा येथे कार्यरत होतो. त्यादिवशी मला मौजे फणसाडी येथे एक व्यक्ती त्याचे घराचे मागे गावठी हातभटटी दारुची विक्री करत असल्याबाबत गोपनिय माहिती मिळाली. त्यावरुन मी स्वतः व माझे कार्यालयातील कर्मचारी मिळून शासकिय वाहनाने मौजे खारी बस स्टॉप येथे गेलो. तेथे मी दोन व्यक्तींना घटनेचे अनुषंगाने माहिती देवुन पंच म्हणुन हजर राहण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य केल्यामुळे आम्ही त्यांचेसह मिळालेल्या माहितीवरुन मौजे फणसाडी येथे एका व्यक्तीचे घरी छापा टाकला. त्यावेळी सदर व्यक्ती त्याचे घरी हजर होता. आम्ही त्याला तेथे येण्याचा उददेश समजावुन सांगुन पंचांसमक्ष त्याचे घराचे झडती घेतली. त्यावेळी तेथे आम्हाला गोणीतील दोन रबरी टयुबमध्ये प्रत्येकी ४० लिटर गावठी हातभटटीची दारु मिळाली. सदरील मुददेमाल ताब्यात घेवुन त्यापैकी १८० मि.लि. क्षमतेच्या दोन बॉटलमध्ये दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करण्यात आली. मी तेथे पंचांसमक्ष पंचनामा तयार केला. त्यावर माझी व पंचांच्या सहया असून त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येतो. आम्ही आरोपीचे नावाची खात्री केली. त्यानंतर आम्ही जप्त मुद्देमाल, नमुने व आरोपीसह कार्यालयात परत आलो. तेथे श्री. नाईक यांनी घटनेच्या अनुषंगाने फिर्याद दिली. प्रस्तुत गुन्हयाचा तपास मी स्वतः केला.

०२. दि. १२/०४/२०२३ रोजी मी सि.ए. परिक्षणाकरीता सिलबंद केलेल्या बॉटलपैकी एक बॉटल पत्राअन्वये श्री. नाईक यांचे हस्ते तपासणीकामी कलिना मुंबई येथील प्रयोगशाळेमध्ये जमा केली. सदर पत्रावर माझी, श्री. नाईक व प्रयोगशाळेतील संबंधीत लिपीकाची सही असून शिक्के आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येतो. त्याअनुषंगाने रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाला नाही. प्रस्तुत गुन्हयाचे तपासाअंती सबळ पुरावा मिळाल्यामुळे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती. दिव्या सावंत यांचे मार्फत .**

०३. हे म्हणणे खरे आहे की, गोपनिय माहिती कोणत्या माध्यमातुन मिळाली, हे पंचनाम्यामध्ये नमुद नाही, मिळालेल्या गोपनीय माहितीची पडताळणी करण्याकरीता आम्ही डम्मी ग्राहक मोक्यावर पाठविला नव्हता, फणसाडी गावामध्ये २०–२५ रहिवासी घरे आहेत.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मोक्यावर जप्त मुददेमाल आम्हाला बेवारस स्थीतीत मिळाला होता, त्याच बेवारस मुद्देमालाचा मी पंचनामा तयार केला, त्यापैकीच १८० मि.ली. दारुचे दोन नमुने सि.ए.परिक्षणाकरीता वेगळे सिलबंद

करण्यात आले होते, त्यावरुन श्री. नाईक यांनी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली होती, मी प्रस्तुत गुन्हयाचा चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र् न्यायालयात सादर केले, मी सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे घटना घडली नाही व मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपासणी पूर्ण

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.08.13 14:50:17 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.१३.०८.२०२४. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.